# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,

औरंगाबाद - ४३१ ००४ (महाराष्ट्र) (भारत)

(नॅक समिती तर्फे 'अ' दर्जा प्राप्त)

दूरध्वनी कार्यालय : (०२४०)२४०३११८/२४०३११९
कुलसचिव : (का)२४०३३३३
(नि)२४००२०३, २४०३३१०
फॅक्स : (०२४०) २४०३३३५
Website : www.bamu.net
e-mail : bcud.office@bamu.ac.in

विद्यापीठ परिसर,
औरंगाबाद - ४३१ ००४
(महाराष्ट्र) (भारत)

## ☀ परिपत्रक ☀

या परिपत्रकाद्वारे सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य, उपप्राचार्य, अध्यापक व अध्यापकेत्तर कर्मचारी यांना मा. कुलगुरूंनी दिलेल्या आदेशानुसार सूचित करण्यात येते की, कार्यालयीन प्रशासकीय कामकाजासाठी ज्या कर्मचाऱ्यास आपण विद्यापीठामध्ये जाण्यासाठी नियुक्ती / प्रतिनियुक्ती केलेली असल्यास संबधीत कर्मचाऱ्याकडे आपल्या महाविद्यालयाचे सक्षम अधिकारी / प्राचार्यांच्या स्वाक्षरीसह शिफारस पत्र व ओळखपत्र असल्याशिवाय संबधीत कर्मचाऱ्यास विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीमध्ये प्रवेश करणे अनुज्ञेय राहणार नाही.

प्रस्तुत प्रकरणी आपल्या महाविद्यालयातील बहुतेक अध्यापक व कर्मचारी महाविद्यालयाचे कार्यालयीन काम नसतांना सुद्धा आपल्या परवानगीशिवाय वारंवार विद्यापीठामध्ये येऊन कार्यालयीन काम करणाऱ्या विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांसोबत अनावश्यक वाद-विवाद करून कार्यालयीन कामकाजामध्ये अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न करतात, त्यामुळे विहित मुदतीत सदरील कामकाज निकाली काढता येत नाही, असे विद्यापीठ प्रशासनाच्या निदर्शनास आलेले आहे. तद्अनुषंगाने आपणास विनंती करण्यात येते की, विद्यापीठ प्रशासनास आपण प्रस्तावित केलेली कामे विहित मुदतीत निकाली काढण्यासाठी आपल्या महाविद्यालयातील कोणताही कर्मचारी, प्राचार्य किंवा सक्षम अधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय विद्यापीठ कार्यालयात जावू नये या संबंधीची सूचना आपल्या महाविद्यालयातील अध्यापक व कर्मचा-यास देण्यात येऊन सहकार्य करावे.

विद्यापीठ प्रांगण,
औरंगाबाद.
संदर्भ:- शैक्ष/संलग्न/एसएसके/२०१६-१७/12820-26
दिनांक :- ०६/०८/२०१६

संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ
विकास मंडळ

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव :-

१. अध्यक्ष / सचिव / प्राचार्य सर्व संलग्नित महाविद्यालये, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
२. परीक्षा नियंत्रक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
३. सर्व उपकुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
४. सर्व सहाय्यक कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
५. स्वीय सहाय्यक, मा. कुलगुरु महोदयांचे कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
६. स्वीय सहाय्यक, कुलसचिव कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.